ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७३ वा | दिनांक : १३/१२/२०२४ | वार : शुक्रवार

# आधी पाठीत खंजीर खुपसला, आता भेटायची हिंमत कशी झाली? : संजय राऊत



**मुंबई :** अजित पवार यांनी शरद पवार यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्यानंतर उद्धव ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत अजित पवारांवर बोचरी टीका केली. हे निर्ढावलेले लोक असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. आम्ही जर असे काम केले असते, तर आमची भेट घेण्याची हिंमतच झाली नसती. माझ्यासारख्या माणसाने जर वडीलधाऱ्यांच्या पाठीमध्ये खंजीर खुपसला असता तर डोळ्याला डोळा भिडवण्याची हिंमत झाली नसती, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी आम्ही काही चूक केली असती तर बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या डोळ्यात डोळे घालण्याची आमची हिंमत झाली नसती आणि लाज देखील वाटली असती. हे माझे वैयक्तिक मत आणि आमच्या पक्षाची भावना असल्याचेही राऊत यांनी म्हटले आहे.

इतक्या महान माणसाच्या विरोधात आपण प्रचार केला. त्यांच्यावर चिखल फेक केली आणि परत शुभेच्छा द्यायला येतात? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हे महाराष्ट्राला किती आवडेल? सांगता येत नाही. मात्र मी नजरेला नजर देऊ शकलो नसतो, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. अजित पवार यांनी शरद पवार यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांच्यासोबत खासदार सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील पटकरे, छगन भुजबळ, पार्थ पवार हे देखील उपस्थित होते. यावरुन संजय राऊत यांनी अजित पवारावंर जोरदार टीका केली.

अजित पवार यांना महाराष्ट्रात काय सुरु आहे हे माहिती आहे का? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रामध्ये रोज खून होत आहेत, दंगली होत आहेत, आणि इथे बसून देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार नाकाने कांदे सोलत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. २० तारखेला महाराष्ट्रातील निवडणुकीला एक महिना होत आहे. तरी देखील अद्याप राज्यात मंत्रिमंडळ स्थापन झालेले नाही. राज्यात होत हत्या होताहेत, याची फडणवीसांना लाच वाटत नाही का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

आम्ही राज्यसभेत पहिल्यांदा आलो होतो, त्यावेळी आम्हाला साध्या घरात जागा देण्यात आली होती. मात्र आता सुनेत्रा पवार यांना जनपथवर चांगले घर देण्यात आले आहे. हे कशासाठी? ही अजित पवार यांची सोय करण्यासाठी केले असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. दिल्ली ही कारस्थान्यांची राजधानी आहे. आणि सुनेत्रा पवार यांना दिलेले घर म्हणजे मोदी सरकारचे कट कारस्थान असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.

शरद पवार यांचा आज वाढदिवस आहे. ते महाराष्ट्राचे आधारवड आहेत. देशाच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान हे अतुलनीय असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. आम्हाला अनेक वर्षे त्यांचे मार्गदर्शन मिळालेले आहे. त्यामुळे त्यांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो लाभावे ही आमची सर्वांची प्रार्थना असते. नेहमी त्यांचा वाढदिवस महाराष्ट्रातील बारामतीत साजरा होतो. मात्र यावेळी अधिवेशन असल्यामुळे ते दिल्लीत थांबले आहेत. त्यामुळे शिवसेना आणि कॉंग्रेसच्या सर्वच खासदारांनी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले.

# परभणीत आंबेडकरी अनुयायांचे भविष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न : सुषमा अंधारे



**मुंबई :** परभणीमध्ये कोम्बिंग ऑपरेशनच्या नावाखाली पुन्हा एकदा आंबेडकरी अनुयायांचे आयुष्य आणि भविष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून चालू असेल, तर आम्ही त्यांचा निषेध करतो, असे ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, परभणीत काल संध्याकाळपासून कोंबीग ऑपरेशन सुरू असल्याचे समजते. काळजीवाहू मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिल्यानंतर दहा दिवसांपेक्षा अधिक कालावधी उलटून गेला मात्र, अजूनही राज्याला गृहमंत्री लाभलेला नाही.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, घडलेल्या घटनेची चौकशी करण्याऐवजीकोम्बिंग ऑपरेशनच्या नावाखाली अशा पिढ्या उध्वस्त करणे आणि बर्बाद करणे, याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. कोंबिंग ऑपरेशनच्या नावाखाली पुन्हा एकदा आंबेडकरी अनुयायींचे आयुष्य आणि भविष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून चालू असेल, तर निश्चितपणे हा अत्यंत निंदनीय आहे, असे म्हणत त्यांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, परभणी हा अत्यंत संवेदनशील एरिया आहे. सगळ्या आंबेडकरी चळवळीतील पँथरांचे निवासस्थान परभणीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संविधानाची प्रतिकृती उध्वस्त केली जात आहे. त्याची प्रतिक्रिया येणे अत्यंत सहज आणि स्वाभाविक आहे. यावेळी आंबेडकरी चळवळीतील अनुयायांनी जो बंद पुकारला त्यासंबंधात पोलिसांकडून पूर्व प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली नाही.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, व्यापारपेठेला तशी कल्पना देणेही अपेक्षित होते. जेव्हा ती घटना घडली तेव्हा काही लोकांनी त्यांची दुकाने चालू ठेवली. संतप्त आंबेडकरी अनुयायांनी काही दुकाने बंद करण्यासाठी जी पावले उचलली, त्याचे समर्थन करता येत नाही. परंतु, अशा घटनेसाठी पोलिस व्यवस्था अन् गृहखाते जबाबदार आहे. गृहखाते असे का वागत आहे? असा सवाल करतानाच त्यांनी राज्याला अजून गृहमंत्री नसल्याच्या मुद्द्यावर बोट ठेवले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ डिसेंबर २०२४


## वैजापूर- गंगापूर तालुक्यातील मुख्याध्यापकांची "दशसूत्री" कार्यशाळा संपन्न

### विद्यार्थ्यांच्या सर्वंकष विकासासाठी दशसूत्रीची संकल्पना - मा. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी








**वैजापुर (सचिन पाटील वालतुरे)** : जिल्हा परिषद शाळांमधून गुणवत्तापूर्ण व संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी दशसूत्री कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक व शिक्षकांनी काम करावे असे निर्देश मा .जिल्हाधिकारी दिलीप स्वामी साहेब यांनी आज पांडव लॉन्स लासूर स्टेशन ता. गंगापूर येथे आयोजित गंगापूर व वैजापूर तालुक्यात कार्यरत मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेत केले.

यावेळी मा. जिल्हाधिकारी स्वामी साहेब यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना साहेब यांच्या प्रशासकीय कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधून दशसूत्रीची शैक्षणिक चळवळ सशक्तपणे उभी राहिल असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, गंगापूरचे तहसिलदार डॉ. नवनाथ वागवाड, वैजापूर तहसिलदार सुनिल सावंत, गंगापूर गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे, वैजापूर गटविकास अधिकारी श्रीकृष्ण बेण्णीकर, जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, श्रीमती लाटकर, श्रीमती अरुणा भुमकर, प्राचार्य डाएट श्रीमती सान्वी देशमुख, गटशिक्षणाधिकारी गंगापूर समाधान आराख, गटशिक्षणाधिकारी वैजापूर हेमंत उशीर यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी जिल्हा परिषद शाळा हाच एक उत्तम पर्याय असून या शाळांमधून सर्वोत्तम शिक्षण देणे हे आपले कर्तव्य असून विद्यार्थ्यांच्या सर्वंकष विकासासाठी शिक्षकांनी दशसूत्रीच्या मार्गाने काम केल्यास शिक्षणाची परिणामकारकता व उपयुक्तता वाढेल.

स्पर्धात्मक युगात स्पर्धाक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांना सामोरे जाण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे व या माध्यमातून त्यांनी यशापयशाची सवय लावणे गरजेचे आहे . आरोग्यक्षम व संस्कारक्षम विद्यार्थी घडवितांना समाज मनाचा आरसा असणाऱ्या शिक्षकांचेही आचरण अनुकरणीय असावे असा संदेश यावेळी मा. जिल्हाधिकारी स्वामी साहेब यांनी दिला.

शिक्षण व संस्कार यांची सांगड घालण्यात शिक्षणव्यवस्थेचे जबाबदार घटक म्हणून आपण कमी पडता कामा नये .शिक्षणात तंत्रज्ञान, कौशल्यपूर्णता, नाविण्यता व रचनात्मकता आणणे आवश्यक असून आनंदाने शिक्षण मिळण्यासाठी व शिक्षणातून आनंद मिळण्यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे.

स्त्री सन्मान व सुरक्षितता, आत्मविश्वास वृद्धी, स्व - अभिव्यक्ती कौशल्य विकासाबरोबरच सुप्त गुणांच्या विकासासाठी नव्या संधी उपलब्ध करून देण्याचे आव्हान शिक्षणव्यवस्थेसमोर आहे .नवशिक्षण पद्धती आणि भविष्यवेधी शिक्षणाचा विचार देणारे शैक्षणिक वातावरण व शिक्षक तयार करणे यासाठी आपल्याला काम करावे लागेल असा आशावाद मा. जिल्हाधिकारी स्वामी साहेब यांनी व्यक्त केला.

वाचनसंस्कृतीच्या ऱ्हासाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त करून हे चित्र बदलण्यासाठी शाळांनी पुढाकार घेण्याची गरज आहे हे विषद केले , स्वतःच्या शैक्षणिक व प्रशासकीय वाटचालीतील अनेक प्रसंग सांगत मा. जिल्हाधिकारी स्वामी साहेब यांनी उपस्थितांना अंतर्मुख केले. प्रास्ताविक जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी तर गटशिक्षणाधिकारी समाधान आराख यांनी आभार मानले.

राजेश हिवाळे यांनी कार्यशाळेचे सूत्रसंचालन केले. या कार्यशाळे स्थळी विज्ञान प्रकल्प सादरीकरण, ग्रंथप्रदर्शन , चित्रप्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, पथनाट्य आयोजित करण्यात आले होते. दशसूत्री कार्यशाळा यशस्वीतेसाठी गटशिक्षणाधिकारी समाधान आराख, हेमंत उशीर यांसह गंगापूर - वैजापूर तालुक्यातील शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व नियोजन समिती शिक्षक सदस्यांनी परिश्रम घेतले .

## नवसाक्षरांचा उल्लास मेळावा




**छत्रपती संभाजीनगर (सरला कामे)** : नवसाक्षर, असाक्षरांसाठी सहज आणि सोप्या भाषेत शिक्षण उपलब्ध करून देण्यावर अनेक शिक्षक काम करतात. ' यात बोलक्या बाहुल्या प्रभावी शैक्षणिक साहित्य बनवून श्रीमती सरला कामे राज्य आदर्श शिक्षिकायांनी सर्व अधिकारी व नवसाक्षरांचे लक्ष वेधून घेतले प्रसंग होता जिल्हास्तरीय उल्लास मेळावा'चे.

पथनाट्य, नाटिकेतूनही शिक्षणाचे महत्व विद्यार्थी, शिक्षकांनी मेळाव्यात मांडले आणि टाळ्यांची दाद मिळविली. तसेच बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातुन व्यसाय कौशल्य व बालसंगोपन या विषयावर मनोरंजनात्मक पध्तीने सादरीकरण केलेउल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमातंर्गत जिल्हा, तालुका स्तरावर उल्लास मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. छत्रपती संभाजीनगरचा मेळावा प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्लभाषा तत्वज्ञ) विभागात भरला.

विभागाच्याव्यासपीठावरून विविध तालुक्यांतून आलेल्या विद्यार्थी, शिक्षकांनी नवसाक्षर, असाक्षरांसाठी सुरू असलेले काम मांडले. संस्कृती, सण, उत्सव, लोककला, संवादाची माध्यमे व साधनांसह प्लॅश कार्ड, चार्ट, बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून शिक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या शैक्षणिक साहित्यातून शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

यावेळी विद्यार्थी, शिक्षकांनी नाटिका, पथनाट्याचे सादरीकरण केले. नवसाक्षरांनी साक्षर झाल्याचे प्रवास करताना कसा उपयोग होतो, हक्काबाबत जाणिव कशी झाली, बँक, टपाल कार्यालयासह विविधठिकाणी कसा उपयोग झाला हे मनोगतातून मांडले.

यावेळी शैक्षणिक साहित्याचे स्टॉल ही मांडण्यात आले. शिक्षकांनी शैक्षणिक साहित्याची माहिती दिली. विविध तालुक्यांचे स्टॉल होते. वैविध्यपूर्ण शैक्षणिक साहित्याचे दर्शन यातून झाले.

प्रारंभी मेळाव्याचे उद्‌घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मिना यांच्या हस्ते झाले. यावेळी डायट प्राचार्य, शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी यांची उपस्थिती


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## सामंथाला २०२५ मध्ये हवा निष्ठावान व प्रेमळ जोडीदार



सामंथा रुथ प्रभूचा माजी पती नागा चैतन्यने शोभिता धुलिपालासोबत दुसरे लग्न केले आहे. ४ डिसेंबरला हैदराबादच्या अन्नपूर्णा स्टुडिओमध्ये दोघांचे लग्न झाले. दरम्यान, सामांथाने सोशल मीडियावर एक गूढ पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्रीची ही पोस्ट सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे.

दक्षिण अभिनेत्री सामंथा रुथ प्रभू हिने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक गूढ पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्रीने तिच्या इन्स्टा स्टोरीमध्ये आगामी २०२५ साठी वृषभ, कन्या आणि मकर राशीच्या भविष्यवाण्यांसह एक पोस्ट शेअर केली आहे.

अभिनेत्रीच्या पोस्टनुसार, २०२५ मध्ये या राशीच्या लोकांच्या आयुष्यात बरेच काही घडू शकते. हे वर्ष त्यांच्यासाठी व्यस्त असेल आणि त्यात त्यांना भरपूर पैसे मिळतील. त्याच वेळी, पोस्टच्या चौथ्या ओळीत असे लिहिले आहे की त्यांना एक विश्वासू आणि प्रेमळ जोडीदार मिळेल आणि अनेक मोठी उद्दिष्टे पूर्ण होतील. पोस्ट शेअर करताना अभिनेत्रीने लिहिले- आमेन.

सामंथा रुथ प्रभूने नागा चैतन्यशी ६ ऑक्टोबर २०१७ रोजी गोव्यात प्रथम हिंदू रितीरिवाजांनुसार आणि नंतर ७ ऑक्टोबर रोजी ख्रिश्चन रितीरिवाजांनुसार विवाह केला. लग्नानंतर समंथाने तिचे नाव बदलून अक्किनेनी ठेवले होते. मात्र, विभक्त होण्याच्या बातम्यांदरम्यान, सामंथाने अक्किनेनीला तिच्या ट्विटर हँडलवरून काढून टाकले होते आणि ते सामंथा रुथ प्रभू असे बदलले होते. ६ ऑक्टोबर २०२१ रोजी दोघांच्या लग्नाला चार वर्षे पूर्ण होणार होती, पण त्याआधीच दोघांचा घटस्फोट झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ डिसेंबर २०२४

## देशातील मंदिराची संपत्ती सरकारने हस्तगत करून गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावी : डॉ.राजेश मिरगे






**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे)** : देशातील मंदिर संस्थानांची संपत्ती सरकारने हस्तगत करून गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावी,मानवी जीवनामध्ये शिक्षणाचे महत्व खूप मोठे आहे असे स्व. डॉ. पंजाबराव देशमुख सांगितले असल्याचे प्राचार्य डॉ. राजेश मिरगे यांनी जेईएस महाविद्यालय जालना येथे आयोजित डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त विशेष व्याख्यानात प्रतिपादन केले.

महाराष्ट्रभर डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तर्फे विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते जे ई एस महाविद्यालय जालना येथे शिवाजी महाविद्यालय अमरावती येथील डॉ. राजेश मिरगे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ.गणेश अग्नोहोत्री होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. बसवराज कोरे होते व्यासपीठावर जरुड जि. अमरावती येथील प्राचार्य डॉ. राम फुलसिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून बोलताना डॉक्टर राजेश मिरगे म्हणाले की, स्वर्गीय भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांना दैववाद मान्य नव्हता माणूस हा कष्टातून मोठा होतो. माणसाच्या परिश्रमासोबत शिक्षणाची जोड असल्यास निश्चित जीवनामध्ये त्याची प्रगती होते.

शेतकरी हा संपूर्ण जगाचा पोशिंदा असून त्याच्या मुलांनी शिकावे म्हणून त्यांनी सर्वांना शिक्षण मोफत मिळावे ही संकल्पना त्या काळात लावून धरली, त्याचा परिणाम असा की आज देशांमध्ये शैक्षणिक क्रांती झाली आहे याचे डॉ. पंजाबराव देशमुख यांना जाते.

शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब जनता, गर्भवती महिला, निराधार वृद्ध यांना विशेष शासनाकडून सवलती व अनुदान मिळावे याचाही आग्रह कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शासनाकडे धरला होता काही वर्षानंतर आज त्यांच्या त्यावेळच्या मागणी साकार झाल्याची दिसते. शिक्षणाशिवाय बहुजन समाजामध्ये क्रांती होऊ शकत नाही हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी पुढे नेला शिवाजी महाराजांसारखा राजा लोक कल्याणकारी होता, त्यांचा वारसा सत्तेतील लोकांनी जपावा ही आग्रह त्यांनी धरला.

आज मात्र उलटे चित्र सत्ताधीशांमध्ये दिसत असल्याचेही डॉ. राजेश मिरगे यांनी सांगितले. आजच्या युवा पिढीने डॉ.पंजाबराव देशमुख यांचा आदर्श घेऊन पुढील जीवनामध्ये वाटचाल करावी त्यामुळे त्यांच्या जीवनात सुख समृद्धी येईल असेही डॉ. मिरगे यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा.बसवराज कोरे म्हणाले की आजच्या युवा पिढीने व्यसनाच्या मागे न जाता शिक्षण पूर्ण करावे, शिक्षण पूर्ण करून आपल्या प्रपंचाला हातभार लावावा, आई-वडिलांचे स्वप्न साकार करावे.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, युवा पिढीने डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवनावरील ग्रंथ वाचून त्या पद्धतीने वाटचाल केल्यास निश्चित त्यांच्यामध्ये अमूलग्राह्य बदल होतील, डॉ.पंजाबराव देशमुख हे देशातील कृषी क्रांतीचे प्रणेते होते, त्यांचा आदर्श आजच्या युवा पिढीने घ्यावा, असेही डॉक्टर अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी प्रा. डॉ.यशवंत सोनुने प्रा. फलके प्रा. श्रीरामे, प्रा.उषा पवार , प्रा. रंजना येपुरवार, आदि, विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांनी तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी व्यक्त केलेत.

## हरवलेले आठ लाखांचे मोबाईल तक्रारदारांना केले परत



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड शहर पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या तक्रारदारांनी मोबाइल हरवल्या बाबत तक्रार दाखल केल्या होत्या.

सदरचा गहाळ मोबाइलचा शोध घेण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री भापकर यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सुर्यवंशी व पो.शि. चौधरी यांनी तांत्रिक तपासाचे आधारे गहाळ झालेले मोबाइल ट्रेस करून मध्य प्रदेश, कर्नाटक तसेच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातुन ८ लाख रुपये किंमतीचे आतापर्यंत ४९ मोबाइल हस्तगत केले.

सदरचे हस्तगत केलेल्या मोबाईल चे दि.१२ डिसेंबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांचे हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत. गहाळ झालेले मोबाईल तक्रारदारांना परत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त करून कन्नड शहर पोलीसांचे विशेष आभार मानले.

तसेच पोलीस अधीक्षक यांनी देखील नागरिकांना त्यांचे मोबाईल व इतर किमती दस्तऐवज प्रवासात व इतर वेळी काळजीपूर्वक व सुरक्षित ठेवावेत असे आवाहन केले.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक छत्रपती संभाजी नगर डॉ. विनयकुमार कुमार राठोड यांचे मार्गदर्शनाखाली पोनी. भापकर यांचे आदेशाने सपोनि. कुणाल सुर्यवंशी, पोशि. विजय चौधरी यांनी कार्यवाही केली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ डिसेंबर २०२४


# "भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार"

## समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त व संदर्भयुक्त ग्रंथ




**लेखक :- डॉ. हेमंत सोनकांबळे**
प्रकाशक :- कैलास पब्लिकेशन, छत्रपती संभाजीनगर
प्रकाशन तारीख :- १२ ऑक्टोबर, २०२४
पृष्ठ संख्या :- २९०
किंमत :- ₹ ३५०

समाजशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे प्राध्यापक डॉ. हेमंत सोनकांबळे यांचे "भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार" हे पुस्तक विशेषत : एन.ई.पी. २०२०, सी.बी.सी.एस./यु.जी.सी. अभ्यासक्रमावर आधारित आहे. हे पुस्तक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि महाराष्ट्रातील इतर सर्व विद्यापीठांच्या बी.ए. आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. याशिवाय, SET/NET आणि इतर स्पर्धा परीक्षांच्या संदर्भातही हे पुस्तक अभ्यासाच्या दृष्टीने खूप महत्त्वपूर्ण आहे. या पुस्तकात समाजशास्त्राचे विविध दृष्टिकोन, भारतीय सामाजिक विचारवंतांची भूमिका आणि आधुनिक समाजशास्त्राचे परिप्रेक्ष्य मांडले गेले आहेत.

महात्मा जोतीराव फुले कला व विज्ञान महाविद्यालय, गोकुंदा (किनवट) येथे समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेले लेखक, आमचे मित्र, डॉ. हेमंत लक्ष्मणराव सोनकांबळे हे समाजशास्त्र विषयाचे अभ्यासक असून शिक्षण, संशोधन आणि सामाजिक परिवर्तन या क्षेत्रांत त्यांचे अनमोल योगदान आहे. ते कनिष्ठ महाविद्यालयीन समाजशास्त्र परिषदेचे राज्य सचिव आहेत, त्यांनी राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समाजशास्त्र विषयक 29 शोधनिबंध सादर केले आहेत. फुले-शाहू-आंबेडकर चळवळींचे तसेच आदिवासी प्रश्नांचे ते अभ्यासक आहेत. आदिवासी गोंड जमतीवर त्यांनी संशोधन केले आहे. याशिवाय 'समाजशास्त्र परिचय आणि सामाजिक संस्था' (२०१४), 'पाचात्य समाजशास्त्रीय विचारवंत' (२०१८) हे समाजशास्त्राचे तर 'जाती अंताची लढाई' (२०२१) कविता संग्रहाचे लेखन त्यांच्या नावे आहे.

समाजशास्त्र हे मानवजातीच्या उत्क्रांतीपासूनच आपल्या सभोवतालच्या समाज व जगाला जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे शास्त्र आहे. याच अनुषंगाने "भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार" हे पुस्तक भारतीय समाजशास्त्रीय विचारांना एक सुस्पष्ट चौकट प्रदान करते. या पुस्तकात भारतीय समाजशास्त्रातील सामाजिक विचारवंतांच्या विचारांची सखोल मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक प्रकरणात महत्त्वपूर्ण सामाजिक विचारवंतांचे जीवनचरित्र, कार्य, विचार आणि योगदान यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. प्रमुख प्रकरणांमध्ये महात्मा जोतीराव फुले यांचे शेतकरी, शिक्षण व धर्मसुधारणांसाठीचे योगदान, अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेले प्रयत्न याची मांडणी केली आहे, राजर्षी शाहू महाराज यांचे आरक्षण विषक धोरण, सामाजिक समता, शैक्षणिक धोरण व महिलांसाठी केलेले महत्त्वाचे कार्य याची माहिती दिली आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्यायाची वैचारिक भूमिका, जाती व्यवस्थेवर सखोल अभ्यास, कामगार कल्याण आणि संविधान निर्मितीतील योगदानाचा आढावा घेतला आहे. या शिवाय महाराजा सयाजीराव गायकवाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये, डॉ. एम.एन. श्रीनिवास, डॉ. इरावती दिनकर कर्वे, डॉ.ए.सी.दुबे आदींचे जीवनचरित्र,कार्य आणि योगदान यांची विस्तृतपणे मांडणी केली आहे. पुस्तकातील दुसरे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे समाजशास्त्रज्ञांचा सिद्धान्ताचे विश्लेषणही अत्यंत तपशीलवार आहे. हे पुस्तक समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी केवळ एक शैक्षणिक साधन नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या व बदलांच्या गतीला समजून घेण्यासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. या पुस्तकाची भाषा सोपी, प्रवाही व अभ्यासकांना आकलन होईल अशी आहे. प्रकरणांची सुलभ आणि स्पष्ट भाषेत मांडणी, गुंतागुंतीच्या संकल्पनांना सोप्या शब्दांत समजावून देण्याचा कौशल्यपूर्ण प्रयत्न केला आहे. लेखकाने विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून लेखन केले आहे. विचारवंतांचे जीवनचरित्र, विचार, तत्त्वज्ञान, सिद्धांत व संकल्पना सहज समजावून देण्यात लेखक यशस्वी ठरले आहेत.

डॉ. हेमंत सोनकांबळे यांचे "भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजशास्त्रीय विचारांचे मूलाधार" हे पुस्तक समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक असून आजच्या समाजात सामाजिक विषमता, धर्म, भाषा व जातीवाद आणि भेदभावावर आधारित समाजात अनेक सामाजिक समस्या दिसून येतात,या समस्यांवर वैचारिक आणि सैद्धांतिक दृष्टिकोनातून उपाय सुचवण्यासाठी या पुस्तकातील विचारवंतांचे विचार आणि भूमिका महत्त्वाच्या ठरतील असा विश्वास वाटतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक चळवळी क्षीण झाल्या आहेत, त्या गतिमान करण्यास या विचारवंतांचे विचार मदत करतील असी आशा वाटते. NEP २०२० च्या अनुषंगाने भारतीय समाजशास्त्राचे मूलभूत विचार, संकल्पना आणि तत्त्वज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हे पुस्तक यशस्वीरीत्या करेल, या बाबत माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. हे पुस्तक समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी, अभ्यासकांसाठी आणि प्राध्यापिकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. ते प्रत्येकाने खरेदी करून आपल्या संग्रही ठेवावे असे आहे.




पुस्तक परीक्षण,
**डॉ. प्रकाश खेत्री,**
अध्यक्ष
कनिष्ठ महाविद्यालयीन
समाजशास्त्र परिषद, महाराष्ट्र
मो. क्र. ७८४३० ९२२४४


# लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे जीवनकार्य प्रेरणादायी : आमदार अब्दुल सत्तार

### गेवराई सेमी येथे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण थाटात



**सिल्लोड ( प्रतिनिधी )** दि. १२, लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी कायम सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून दिला असे स्पष्ट करीत लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे जीवनकार्य प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन शिवसेना नेते तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी गेवराई सेमी ता. सिल्लोड येथे व्यक्त केले.

गेवराई सेमी येथे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार यांनी गोपीनाथराव मुंडे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकीत जुन्या आठवणीला उजाळा दिला. माझ्या राजकीय जीवनात गोपीनाथराव मुंडे यांनी केलेली मदत अविस्मरणीय असल्याची भावना देखील मंत्री अब्दुल सत्तार व्यक्त केली.

गेवराई सेमी गावात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण होत असताना मनस्वी आनंद होत असल्याचे आ.अब्दुल सत्तार म्हणाले.याप्रसंगी माजी उपसभापती अजीज बागवान, हरिदास ताठे, दादाराव ताठे, सरपंच सतीश ताठे, ज्ञानेश्वर ताठे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक विशाल जाधव, सयाजी वाघ, महादु ताठे, कडूबा कापडे, मुरलीधर कापडे, पंढरी ताठे,अंकुश ताठे, प्रकाश ताठे, शांताराम ताठे खुल्लोड येथील सरपंच नर्सिंग वाघ, चेअरमन हनुमंत वाघ, तंटामुक्त अध्यक्ष कैलास वाघ, माजी चेअरमन मगन दहीकर, रामेश्वर सुरडकर, सळूबा वाघ आदींसह पंचक्रोशीतील नागरिक, गावकरी उपस्थित होते.


